नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३९३**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २२ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - जितेंद्र निना खर्चे,

वय - ३५ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - भालेगाव, ता. मलकापुर जि. बुलढाणा.

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. मी जगन नारखेडेच्या केस संदर्भाने साक्ष देण्याकरिता आलो. मी जगन नारखेडे याला ओळखतो. माझ्या तीन चार घराच्या अंतरावरच त्याचे घर आहे. सुरूवातीला मी जगन याला माझा घरचा कापूस दिला. तो कापूस मी दि.२३.०६.२०२३ रोजी ९२ क्वींटल कापूस दिला. तो कापूस मी दहा हजार रूपये क्वींटल भावाने दिला. तसेच मी त्याला हरभरा व मक्का दिला होता. हरभरा १२ क्वींटल व मक्का ७९ क्वींटल जगनला दिला होता. त्याचे सर्व पैसे मला जगनने दिले. जगन हा कापसाचा व्यवसाय करतो. माझे मावस भाऊ व इतर शेतकरी त्याला भेटायला आले. ते सगळे जन कापसाचा भाव ठरवून गेले. माझ्या साडूचा मला कापूस देवू की नाही म्हणून फोन आला. कापसाच्या वाटपाचे पैसे जगन नारखेडे हा देत आहे त्यामुळे त्याला कापूस देण्यास काही हरकत नाही असे मी साडूला सांगितले. जगन नारखेडे व त्याने त्याचे गाडीवाले विनायक गारमोडे व भगवान घुले हे कापूस घेण्याकरिता शेतक-यांकडे आले होते. त्यांनी तो कापूस नेला. तो कापूस जिनींगमध्ये विकला. ते सर्व पैसे त्यांनी जगन नारखेडेला नेवून दिले. त्यानंतर जगन नारखेडे १३ शेतक-यांपैकी काही शेतक-यांना १० हजार क्वींटलप्रमाणे तर काही शेतक-यांना ९ हजार क्वींटलप्रमाणे पैसे दिले. जगन नारखेडेने पूर्ण ५५७ क्वींटलचे पैसे दिले. त्यानंतर या व्यतीरिक्त आणखी १३ शेतक-यांनी जगन नारखेडे याला ४०५ क्वींटल कापूस दिला. त्यातले अर्धे पैसे जगन नारखेडे याने त्या १३ शेतक-यांना दिले. त्यानंतर आणखीन १७ शेतक-यांनी कापूस जगन नारखेडेला दिला. त्या १७ शेतक-यांचा ७०१ क्वींटल कापूस जगनला दिला. ज्यावेळेस तो ७०१ क्वींटल कापूस गाडीत भरला त्यावेळी १ हजार रूपये क्वींटल प्रमाणे अग्रीम स्वरूपात दिले. ते ७०१ क्वींटलचे पैसे देण्या आगोदर जगन नारखेडे

हा फरार झाला. त्या शेतक-यांनी माझ्या मुला बाळांना मारण्याची धमकी दिली. त्याची भिती मला वाटल्यामुळे मी माझे शेत विकून काहींना ३ हजार तर काहींना ५५०० तर काहींना ७ हजार रुपये क्वींटल प्रमाणे पैसे दिले. त्यामध्ये माझे सहा एकर शेत व अशोक नगर येथील ३ गुंठे जागा गेली. बाकी रक्कम मिळाली पाहीजे त्यामुळे आम्ही जगन नारखेडेविरुध्द तक्रार करू उर्वरित रक्कम मिळाली पाहिजे आमच्या शेतक-यांची इच्छा होती. मी आरोपींना ओळखतो. दोन आरोपी विनायक गारमोडे व भगवान घुले आज न्यायालयात हजर आहेत तर जगन हा दृकश्राव्य पध्दतीने हजर आहे. मी त्यांना ओळखतो. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. जबाब देतांना मी पोलीसांना हिशोबाची वही दिली होती. त्याच्या प्रती आता मला दाखविण्यात आल्या. त्यास दस्तऐवज ओळखण्याकरिता एकत्रीतपणे आर्टीकल अ देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु.</u>**

०२. मी जगन नारखेडेविरुध्द आजपर्यंत फिर्याद दिलेली नाही. तसेच मी जगन नारखेडे याला पैस मिळण्याकरिता वकीलांमार्फत नोटीस वगैरे दिली नव्हती. तसेच मी जगन विरुध्द वसुलीकरिता दिवाणी दावा दाखल केला नव्हता. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझे पाहून इतर शेतक-यांनी जगन नारखेडेला कापूस दिला असे पोलीसांना सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझा पहिले १३ शेतकरी नंतर १३ शेतकरी व नंतर १७ शेतकरी यांच्यासोबत माझा प्रत्यक्षात देण्याघेण्याचा कोणताही व्यवहार झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर शेतक-यांसोबतचा व्यवहार हा माझ्या समक्ष झालेला नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी माझे मावस भाऊ व इतर शेतकरी त्याला भेटायला आले. ते सगळे जन कापसाचा भाव ठरवून गेले असे सांगितले नव्हते. सदर बाब मी आज न्यायालयात पहिल्यांदाच सांगत आहे. मी पोलीसांना बयाण देतेवेळी माझ्या साडूचा मला कापूस देवू की नाही म्हणून फोन आला. कापसाच्या वाटपाचे पैसे जगन नारखेडे हा देत आहे त्यामुळे त्याला कापूस देण्यास काही हरकत नाही असे मी साडूला सांगितले असे सांगितले नव्हते. मी पोलीसांना बयाण देतेवेळी जगन नारखेडे हा कापूस घेण्याकरिता आला होता ही बाब पोलीसांना सांगितली नव्हती. सदर दोन्ही बाबी मी आज न्यायालयात पहिल्यांदाच सांगत आहे. मी पोलीसांना बयाण देतेवेळी ते ७०१ क्वींटलचे पैसे देण्या आगोदर जगन नारखेडे हा फरार झाला असे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०३.		मी आजपर्यंत माझा जबाब वाचून पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जगन नारखेडे हा प्रत्यक्षात शेतक-यांकडे कापूस घेण्याकरिता गेलेला नाही व तसे माझ्या जबाबात देखील नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर व्यवहाराशी जगन नारखेडे याचा कुठलाही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४.		आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्री. ए.सी. एदलाबादकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०५.		हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे शेती होती. त्यामुळे मी पिकवत देखील होता व तो पिकवलेला माल विकत देखील होतो. त्याचा अनुभव मला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही माल हा कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या माध्यमातून विकावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, जगन नारखेडेला जो माल विकला तो कृषी उत्पन्न बाजार समितीला बाजुला ठेवून तो केवळ ओळखीच्या आधारे तो माल विकला. हे म्हणणे खरे आहे की, ज्या १३ लोकांचा माल घ्यायला जे लोक आले होते त्या १३ लोकांचे पैसे त्यांना मिळालेले आहे. जगन नारखेडे हा गाव नात्याने माझा साला लागतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६.		हे म्हणणे खरे आहे की, कास्तकार व जगन यांच्यात काय बोलणे झाले त्याबाबत मला प्रत्यक्षात काहीही माहीती नाही. दि.२४.०५.२०२३ रोजी देवधाबा येथे विनायक गारमोडे गेले होते. त्यांनी सोपान सपकाळ व सुरेश सुरंगे यांचा माल त्यांनी भरून आणला होता. हे म्हणणे खरे आहे की, जो माल त्यांनी भरून आणला होता त्या मालाचे पैसे त्यांना मिळाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जो माल विनायक गारमोडे याने भरला त्याचे

पूर्ण पैसे त्या कास्ताकाराला मिळाले आहेत. हे म्हणणे खरे होणार नाही की, सदर व्यवहारात मी कमीशन एजंट म्हणून काम करीत होतो व त्या व्यवहाराबाबत मला दलाली मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच मी माझी शेती व प्लॉट विकून कास्ताकारांना पैसे दिले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र.१, ४, ११, १२, ५, ६, ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मोरे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र.१, ४, ११, १२, ५, ६, ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र.१, ४, ११, १२, ५, ६, ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.04.08 13:34:26 +0530

दिनांक : ०८/०४/२०२६.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर